"ग्रामपंचायत (बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट) सार्वत्रिक निवडणूक-
आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे
- आदेश, २०२६"

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/ग्रापनि-२०२१/प्र.क्र.४/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २५/०५/२०२६

संदर्भ -१. महाराष्ट्र अधिनियम क्र.२२, दिनांक ११/०३/२०२२
२. राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक २४/११/२०२१, दिनांक २९/१२/२०२१, दिनांक २७/०१/२०२२ व दिनांक २२/०७/२०२२ चे आदेश

## आ दे श

**ज्याअर्थी**, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदींनुसार:-

i) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण (Superintendence), संचालन (Direction) व नियंत्रणाचे (Control) पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित (Vested) केले आहेत.

ii) ग्रामपंचायतींच्या निवडणुकामुक्त (Free), न्याय्य (Fair) व पारदर्शक (Transparent) वातावरणात पार पडण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

iii) ग्रामपंचायतींची मुदत संपण्यापूर्वी तेथे सार्वत्रिक निवडणूक घेणे बंधनकारक आहे;

**ज्याअर्थी,** ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे, विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करणे आणि प्रत्यक्ष निवडणूक घेणे अशा तीन प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो व या तिन्ही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये विविध उप-टप्पे आहेत. राज्यात मोठया संख्येने असलेल्या ग्रामपंचायती व त्यांच्या निवडणुकी संदर्भात विविध टप्पे व उप-टप्पे पूर्ण करण्याकरिता लागणारा कालावधी विचारात घेता, प्रभाग रचनेची सुरुवात सर्व साधारणपणे मुदत संपण्याच्या सुमारे वर्षभर अगोदर होते;

**ज्याअर्थी,** मा.सर्वोच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.९८०/२०१९ मध्ये दि. ४ मार्च २०२१ चे आदेश व महाराष्ट्र शासनाने, सन २०२१ चा अध्यादेश क्र. ३ दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १० (क) मध्ये केलेली सुधारणा याची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी तसेच राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकांच्या विविध टप्प्यांवरील वेळोवेळी दिलेल्या वेगवेगळ्या आदेशांमुळे होणारा संभ्रम टाळण्याकरिता आणि निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याकरिता एकत्रित व सर्वसमावेशक असे दिनांक २४/११/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले होते. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश विचारात घेऊन दिनांक २९/१२/२०२१, दिनांक २७/०१/२०२२ व दिनांक २२/०७/२०२२ रोजी प्रभाग रचना व आरक्षणाचे अंशत: सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत;

**ज्याअर्थी,** सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२२, दिनांक ११/०३/२०२२ च्या सुधारणेन्वये "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट कलम (१) मधील, खंड (ब) मधील "राज्य निवडणूक आयोग" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या मजकुराऐवजी, "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात येईल." अशी दुरुस्ती करुन **प्रभाग रचनेचे अधिकार शासनाकडे निहित** केले आहे;

**ज्याअर्थी,** "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट कलम (२) मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतीतील सदस्यांचे **आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे** निहित आहेत;

**ज्याअर्थी,** "ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) आदेश, २०२१"मध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे;

**आणि ज्याअर्थी,** अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट स्थानिक स्वराज्य संस्थामधील आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका क्र. १८७/२०२५ दाखल झाली असून, सदर याचिका विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ ला संलग्न करण्यात आली आहे. सदर प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट असल्याने, अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी आरक्षणाचे स्वतंत्र आदेश देण्याची तजवीज ठेवण्यात येत आहे;

**त्याअर्थी**, मी, दिनेश वाघमारे, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १०-अ (४) नुसार मिळालेल्या व

तर प्राप्त अधिकारांचा वापर करून ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्य संख्या ठरविणे, प्रभाग रचना करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणेबाबतचे यापूर्वीचे दिनांक २४/११/२०२१,

दिनांक २९/१२/२०२१, दिनांक २७/०१/२०२२ व दिनांक २२/०७/२०२२ चे आदेश अधिक्रमित करुन **बिगर / अंशत: अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट ग्रामपंचायतीतील सदस्यांच्या आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारीत आदेश** निर्गमित करीत आहेत.

१. **संक्षिप्त नाव:**

या आदेशाला **"ग्रामपंचायत (बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट) सार्वत्रिक निवडणूक (आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे) आदेश, २०२६"** असे संबोधिले जाईल.

२. **अधिकार प्रदान:**

राज्य निवडणूक आयोगाने, ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुक प्रक्रियेतील सदस्यांचे आरक्षण निश्चित करून ते चक्रानुक्रमे फिरवणे, या बाबतचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना यापुर्वीच प्रदान केले आहेत.

ग्रामपंचायती ह्या लोकशाहीच्या तिसऱ्या स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने, लोकशाही मजबूत करण्यात त्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे, म्हणून जिल्हाधिकारी यांनी ग्रामपंचायत निवडणुकांचे कामकाज पार पाडतांना, लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेतली पाहिजे. प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना निवडणुकांचे पावित्र्य राखणे आणि निवडणूक प्रक्रिया मुक्त, न्याय्य व पारदर्शक रितीने पार पाडण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असेल.

२.१ **जनगणनेची लोकसंख्या**

जनगणना कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या लगतच्या जनगणनेतील लोकसंख्येच्या आधारावर **परिशिष्ट १** नुसार ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्य संख्येची परिगणना करण्यात येते.

३. **आरक्षित पदांसाठी सदस्य संख्या निश्चित करण्याची कार्यपद्धती:**

३.१ ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्य संख्येच्या आधारावर विविध प्रवर्गांना देय आरक्षित सदस्य संख्येची परिगणना यथास्थिती **परिशिष्ट ३ (बिगर/ अंशत: अनूसुचित क्षेत्रासाठी)** नुसार करण्यात यावी. त्यानुसार प्रभागनिहाय जागांना प्रत्येक प्रवर्गाचे व स्त्रियांचे आरक्षण देणे आवश्यक आहे.

३.२ मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६ मध्ये दिनांक ०६/०५/२०२५ रोजी दिलेले निर्देश व महाराष्ट्र अधिनियम क्र. १९, दिनांक ०१ फेब्रु.२०२२ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १० (क) मध्ये केलेली सुधारणा विचारात घेता, ग्रामपंचायतीचे एकूण आरक्षण (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे एकत्रित आरक्षण) ५०% च्या वर जात असल्यास, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे (ना.मा.प्र) आरक्षण कमी करुन एकत्रित आरक्षण ५०% च्या मर्यादेत आणण्यात येईल. अशाप्रकारे एकूण आरक्षण ५०% च्या मर्यादेत व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण २७ % च्या मर्यादेत देताना **अपूर्णांक दुर्लक्षित करावा.**

**आरक्षण मर्यादेची अंमलबजावणी करताना सदस्य संख्येची गणना खालील तक्त्यानुसार करण्यात यावी.**

| ग्रामपंचायत सदस्य संख्या | एकूण सदस्य संख्येचे ५०% | एकूण आरक्षण ५०% च्या मर्यादेत (अपूर्णांक दुर्लक्षित करावा) | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग जागा ( सदस्य संख्येच्या २७%) | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी जास्तीत जास्त देय सदस्य संख्या (अपूर्णांक दुर्लक्षित करावा)* |
|---|---|---|---|---|
| ७ | ३.५ | ३ | १.८९ | १ |
| ९ | ४.५ | ४ | २.४३ | २ |
| ११ | ५.५ | ५ | २.९७ | २ |
| १३ | ६.५ | ६ | ३.५१ | ३ |
| १५ | ७.५ | ७ | ४.०५ | ४ |
| १७ | ८.५ | ८ | ४.५९ | ४ |

***नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी प्रत्यक्ष देय जागा ह्या परिशिष्ट ३ मधील अ.क्र. ७ मध्ये नमूद सुत्राप्रमाणे ठरविण्यात याव्यात.**

**मात्र अनुसूचित जाती (अ.जा) व अनुसूचित जमातीसाठी (अ.ज) लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षित जागांची गणना करताना तसेच महिलांसाठी आरक्षित जागांची (एकूण सदस्य संख्येच्या ५०%)** गणना करताना, ०.५ किंवा अधिक असलेला अपूर्णांक १ म्हणून गणण्यात येईल.

३.३ मा. उच्च न्यायालयाच्या, औरंगाबाद खंडपीठाने जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या अनुषंगाने **रिट याचिका क्र. ५३८६/२००६ (उदय पवार विरुध्द राज्य निवडणूक आयोग व इतर)** मध्ये दि. ३ ऑक्टोबर, २००६ रोजी व त्यानंतर **रिट याचिका क्र. ६३८९/२००६ (प्रशांत बंब विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर)** मध्ये दि.०९/०२/२००७ रोजी प्रवर्गांचे **आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे बंधनकारक** असल्याचे आदेश दिले आहेत, व

ह्या आदेशांचे अनुपालन आयोग करीत आहे. असे चक्र फिरविणेसाठी कोणत्या प्रभागात यापुर्वी आरक्षण झालेले आहे व कोणत्या प्रभागात आता देय आहे हे समजणे आवश्यक आहे.

३.४ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पार पडलेल्या निवडणुकांमध्ये विविध ग्रामपंचायतींमध्ये जी आरक्षणे देण्यात आली होती त्याची माहिती सोबत जोडलेल्या **परिशिष्ट ४** मध्ये भरण्यात यावी. याप्रमाणे सर्व प्रवर्गांचे म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांचे मागील निवडणुकांमधील आरक्षणाचा समावेश असावा. या माहितीमुळे या व पुढील निवडणुकांमधील आरक्षण चक्रानुक्रमे फिरवणे सोपे जाईल.

## ४ अनुसूचित जाती करिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे:

### ४.१ अनुसूचित जातीच्या (अ.जा.) आरक्षणाचे तत्व:

४.१.१ अ.जा.च्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे प्रभागातील अ.जा.च्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने करण्यात येईल. अ.जा. च्या लोकसंख्येची प्रभागातील एकूण लोकसंख्येशी असलेल्या टक्केवारीनुसार तक्ता तयार करावा. **परिशिष्ट ५** नुसार सदर तक्ता **उतरत्या क्रमाने** लावण्यात यावा. **प्रभागात अनुसूचित जातीची शुन्य लोकसंख्या असली तरी त्या प्रभागांचा देखील उतरत्या क्रमाने आरक्षण निश्चित करण्यासाठी समावेश करण्यात यावा.**

४.१.२ अ.जा. च्या जागांचे वाटप करताना शक्यतोवर **प्रत्येक प्रभागात १ जागा बिनराखीव** ठेवावी.

४.१.३ जेव्हा दोन अगर अधिक प्रभागांमधील अ. जा. लोकसंख्येची **टक्केवारी समान असेल**, तेव्हा ज्या प्रभागातील अ.जा. ची **प्रत्यक्ष लोकसंख्या जास्त** आहे तो प्रभाग आरक्षित होईल. जर अशा प्रभागांतील प्रत्यक्ष लोकसंख्या देखील समान असेल, तर **सोडतीने आरक्षण** निश्चित केले जाईल.

४.१.४ आरक्षित जागांचे वाटप करताना आरक्षित जागांची संख्या आणि उपलब्ध प्रभागांची संख्या विचारात घेवून वाटप करावे.

### ४.२ नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या पहिल्या निवडणूकीतील अ.जा.चे आरक्षण:

४.२.१ जर, अ.जा. करीता आरक्षित असलेल्या जागांची संख्या व प्रभागांची एकूण संख्या **समान असेल** तर प्रत्येक प्रभागात अ.जा. ची **एक जागा देण्यात येईल**.

४.२.२ जर अ.जा. करिता आरक्षित असलेल्या जागांची संख्या ही प्रभागांच्या एकूण संख्येपेक्षा **कमी असेल**; तर अ.जा. लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल,

त्या प्रभागापासून सुरुवात करुन, **परिशिष्ट क्र.५** नुसार उतरत्या क्रमाने तितक्या प्रभागात अ.जा. ची एक जागा देण्यात येईल. (**परिशिष्ट क्र.७** मधील **उदा. १ व २** पहावे.)

४.२.३ जर, अ.जा. करिता आरक्षित असलेल्या जागांची संख्या ही प्रभागांच्या एकूण संख्येपेक्षा जास्त असेल, तर **प्रथम फेरीत** प्रत्येक प्रभागात अ.जा. ची एक जागा देण्यात येईल. त्यानंतर **दुसऱ्या फेरीत** शिल्लक जागा आरक्षित करण्याकरीता अ.जा. लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासून सुरुवात करुन, **परिशिष्ट क्र.५** नुसार उतरत्या क्रमाने तितक्या प्रभागात अ.जा. ची एक अतिरीक्त जागा देण्यात येईल. (**परिशिष्ट क्र.७** मधील **उदा. ३** पहावे.)

४.३ **इतर कोणत्याही निवडणूकांमधील आरक्षण:**

४.३.१ जर, अ.जा. करीता आरक्षित असलेल्या जागांची संख्या व प्रभागांची एकूण संख्या **समान असेल** तर प्रत्येक प्रभागात अ.जा. ची एक जागा देण्यात येईल.

४.३.२ जर, अ.जा. करिता आरक्षित असलेल्या जागांची संख्या ही प्रभागांच्या एकूण संख्येपेक्षा **कमी असेल** तर ज्या प्रभागांना मागील निवडणूकांमध्ये अ.जा. चे आरक्षण देण्यात आले होते असे प्रभाग वगळून त्यापुढील प्रभागांना, सर्वाधिक अ.जा. लोकसंख्येची टक्केवारी असलेल्या प्रभागापासून सुरुवात करुन, **परिशिष्ट क्र.५** नुसार उतरत्या क्रमाने अ.जा. ची एक जागा देण्यात येईल. (**परिशिष्ट क्र.७** मधील **उदा. १ व २** पहावे.)

४.३.३ जर, अ.जा. करिता आरक्षित असलेल्या जागांची संख्या ही प्रभागांच्या एकूण संख्येपेक्षा **जास्त असेल,** तर **प्रथम फेरीत** प्रत्येक प्रभागात अ.जा. ची एक जागा देण्यात येईल. त्यानंतर **दुसऱ्या फेरीत** शिल्लक जागा आरक्षित करण्याकरीता ज्या प्रभागांना मागील निवडणूकांमध्ये अ.जा.ची अतिरीक्त जागा देण्यात आली होती असे प्रभाग वगळून त्यापुढील प्रभागांना, सर्वाधिक अ.जा. लोकसंख्येची टक्केवारी असलेल्या प्रभागापासून सुरुवात करुन, **परिशिष्ट क्र.५** नुसार उतरत्या क्रमाने अ.जा.ची एक अतिरीक्त जागा देण्यात येईल. (**परिशिष्ट क्र.७** मधील **उदा. ३** पहावे.)

## ५ अनुसूचित जमाती करिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे.

### ५.१ अनुसूचित जमातीच्या (अ.ज.) आरक्षणाचे तत्व:

५.१.१ अ.ज. च्या जागांच्या आरक्षणाचे वाटप हे प्रभागातील अ.ज. च्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने करण्यात येईल. अ.ज. च्या लोकसंख्येची प्रभागातील एकूण लोकसंख्येशी असलेल्या टक्केवारीनुसार तक्ता तयार करावा. **परिशिष्ट ६** नुसार सदर तक्ता उतरता क्रमाने लावण्यात यावा.

**प्रभागात अनुसूचित जमातीची शुन्य लोकसंख्या असली तरी त्या प्रभागांचा देखील उतरत्या क्रमाने आरक्षण निश्चित करण्यासाठी समावेश करण्यात यावा.**

५.१.२ अ.ज. च्या जागांचे वाटप करताना शक्यतोवर प्रत्येक प्रभागात १ जागा **बिनराखीव** ठेवावी.

५.१.३ जेव्हा दोन अगर अधिक प्रभागांमधील अ. ज. लोकसंख्येची टक्केवारी समान असेल, तेव्हा ज्या प्रभागातील अ.ज. ची प्रत्यक्ष लोकसंख्या जास्त आहे तो प्रभाग आरक्षित होईल. जर अशा प्रभागातील प्रत्यक्ष लोकसंख्या देखील समान असेल, तर सोडतीने आरक्षण निश्चित केले जाईल.

५.१.४ आरक्षित जागांचे वाटप करताना आरक्षित जागांची संख्या आणि उपलब्ध प्रभागांची संख्या विचारात घेवून वाटप करावे.

## ५.२ नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या पहिल्या निवडणूकीतील अ.ज. चे आरक्षण:

५.२.१ जर, अ.ज. करीता आरक्षित असलेल्या जागांची संख्या व प्रभागांची एकूण संख्या **समान असेल** तर प्रत्येक प्रभागात अ.ज. ची एक जागा देण्यात येईल.

५.१.१ जर अ.ज. करिता आरक्षित असलेल्या जागांची संख्या ही प्रभागांच्या एकूण संख्येपेक्षा **कमी असेल**; तर अ.ज. लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासून सुरुवात करुन, **परिशिष्ट ६** नुसार उतरत्या क्रमाने तितक्या प्रभागात अ.ज. ची एक जागा देण्यात येईल. (**परिशिष्ट क्र.७** मधील **उदा. १ व २** पहावे.)

५.१.२ जर, अ.ज. करिता आरक्षित असलेल्या जागांची संख्या ही प्रभागांच्या एकूण संख्येपेक्षा जास्त असेल**,** तर **प्रथम फेरीत** प्रत्येक प्रभागात अ.ज. ची एक जागा देण्यात येईल. त्यानंतर **दुसऱ्या फेरीत** शिल्लक जागा आरक्षित करण्याकरीता सर्वाधिक अ.ज. लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासून सुरुवात करुन, **परिशिष्ट क्र.६** नुसार उतरत्या क्रमाने तितक्या प्रभागात अ.ज. ची एक अतिरीक्त जागा देण्यात येईल. (**परिशिष्ट क्र.७** मधील **उदा. ३** पहावे.)

## ५.२ इतर कोणत्याही निवडणूकांमधील अ.ज. चे आरक्षण:

५.२.१ जर, अ.ज. करीता आरक्षित असलेल्या जागांची संख्या व प्रभागांची एकूण संख्या **समान असेल** तर प्रत्येक प्रभागात अ.ज. ची एक जागा देण्यात येईल.

५.२.२ जर, अ.ज. करिता आरक्षित असलेल्या जागांची संख्या ही प्रभागांच्या एकूण संख्येपेक्षा **कमी असेल** तर ज्या प्रभागांना मागील निवडणूकांमध्ये अ.ज. चे आरक्षण देण्यात आले होते असे प्रभाग वगळून त्यापुढील प्रभागांना, सर्वाधिक अ.ज. लोकसंख्येची टक्केवारी असलेल्या प्रभागापासून सुरुवात करुन, **परिशिष्ट क्र.६** नुसार उतरत्या क्रमाने अ.ज. ची एक जागा देण्यात येईल. (**परिशिष्ट क्र.७** मधील **उदा.१ व २** पहावे.)

५.२.३ जर, अ.ज. करिता आरक्षित असलेल्या जागांची संख्या ही प्रभागांच्या एकूण संख्येपेक्षा जास्त असेल, तर **प्रथम फेरीत** प्रत्येक प्रभागात अ.ज. ची एक जागा देण्यात येईल. त्यानंतर **दुसऱ्या फेरीत** शिल्लक जागा आरक्षित करण्याकरीता ज्या प्रभागांना मागील निवडणूकांमध्ये अ.ज.ची अतिरीक्त जागा देण्यात आली होती असे प्रभाग वगळून त्यापुढील प्रभागांना, सर्वाधिक अ.ज. लोकसंख्येची टक्केवारी असलेल्या प्रभागापासून सुरुवात करुन,**परिशिष्ट क्र.६** नुसार उतरत्या क्रमाने अ.ज. ची एक अतिरीक्त जागा देण्यात येईल. (**परिशिष्ट क्र.७** मधील **उदा. ३** पहावे.)

## ६. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे (ना.मा.प्र) करिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे:

### ६.१ ना.मा.प्र. आरक्षणाची तत्वे -

६.१.१ मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६ मध्ये दिनांक ०६/०५/२०२५ रोजी दिलेले निर्देश व महाराष्ट्र अधिनियम क्र. १९, दिनांक ०१ फेब्रु.२०२२ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १० (क) मध्ये केलेली सुधारणा विचारात घेता, ग्रामपंचायतीचे एकूण आरक्षण (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे एकत्रित आरक्षण) ५०% च्या वर जात असल्यास, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण कमी करुन, एकत्रित आरक्षण ५०% च्या मर्यादेत आणण्यात येईल. अशाप्रकारे एकूण आरक्षण ५०% च्या मर्यादेत व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण २७ % च्या मर्यादेत देताना **अपूर्णांक दुर्लक्षित करावा.**

६.१.२ ना.मा.प्र. ला देय असलेल्या जागांची गणना करताना, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागारिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग जागांचे एकत्रित आरक्षण ५० % आरक्षणाच्या मर्यादेत सिमित असेल. **या आरक्षण मर्यादेची अंमलबजावणी करताना सदस्य संख्येची गणना खालील तक्त्यानुसार करण्यात यावी.**

| ग्रामपंचायत सदस्य संख्या | एकूण सदस्य संख्येचे ५०% | एकूण आरक्षण ५०% च्या मर्यादेत (अपूर्णांक दुर्लक्षित करावा) | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग जागा ( सदस्य संख्येच्या २७%) | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी जास्तीत जास्त देय सदस्य संख्या (अपूर्णांक दुर्लक्षित करावा)* |
|---|---|---|---|---|
| ७ | ३.५ | ३ | १.८९ | १ |
| ९ | ४.५ | ४ | २.४३ | २ |
| ११ | ५.५ | ५ | २.९७ | २ |
| १३ | ६.५ | ६ | ३.५१ | ३ |
| १५ | ७.५ | ७ | ४.०५ | ४ |
| १७ | ८.५ | ८ | ४.५९ | ४ |

***नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी प्रत्यक्ष देय जागा ह्या परिशिष्ट ३ मधील अ.क्र.७ मध्ये नमूद केलेल्या सुत्रानुसार ठरविण्यात याव्यात.**

६.१.३ ना.मा.प्र. च्या जागांचे वाटप हे सोडत पध्दतीने करण्यात यावे. ना.म.प्र. करीता राखून ठेवावयाच्या जागांची संख्या आणि ना.मा.प्र. आरक्षण देय होणाऱ्या प्रभागांची संख्या समान असल्यास, प्रत्येक प्रभागात १ जागा थेट नेमून देण्यात यावी.

६.१.४ ना.मा.प्र.चे आरक्षण प्रत्येक निवडणूकीमध्ये चक्रानुक्रमे फिरविण्यात यावे, म्हणजे जे प्रभाग मागील निवडणुकीमध्ये ना.मा.प्र. करीता आरक्षित नव्हते, त्या प्रभागांना या निवडणूकीत चक्रानुक्रमे फिरविण्याच्या धोरणानुसार आरक्षण द्यावे.

६.१.५ ना.मा.प्र. च्या जागा नेमून देताना **शक्यतोवर प्रत्येक प्रभागात १ जागा बिनराखीव ठेवण्यात** यावी. त्यामुळे ना.मा.प्र. च्या जागांचे वाटप करताना ज्या प्रभागात केवळ एकच जागा शिल्लक राहिली असेल असे प्रभाग ना.मा.प्र.चे वाटप करताना सोडतीतून वगळण्यात यावेत.

**६.२ नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या पहिल्या निवडणूकीमध्ये ना.मा.प्र. च्या आरक्षणाचे वाटप :**

६.२.१ प्रथम ना.मा.प्र. करीता वाटप करावयाच्या २७% च्या मर्यादेत जागांच्या संख्येची गणना परिच्छेद ६.१.२ मध्ये स्पष्ट केल्यानुसार एकत्रित आरक्षणाची ५०% कमाल मर्यादा विचारात घेवून करावी.

६.२.२ त्यानंतर अ.जा. व अ.ज. करीता आरक्षित जागा वगळल्यानंतर ज्या प्रभागांमध्ये एकच जागा बिनराखीव राहिलेली आहे असे प्रभाग सोडतीमधून वगळण्यात यावेत.

६.२.३ परिच्छेद ६.२.२ नुसार वगळणी केल्यानंतर उर्वरित जागांमधून ना.मा.प्र. च्या जागांचे वाटप सोडतीने करण्यात यावेत.

**६.३ इतर कोणत्याही निवडणूकीमधील ना.मा.प्र. च्या जागांचे वाटप**

६.३.१ प्रथम ना.मा.प्र. करीता वाटप करावयाच्या जागांच्या संख्येची गणना परिच्छेद ६.१.२ मध्ये स्पष्ट केल्यानुसार एकत्रित आरक्षणाची ५०% कमाल मर्यादा विचारात घेवून करावी.

६.३.२ त्यानंतर अ.जा. व अ.ज. करीता आरक्षित जागा वगळल्यानंतर ज्या प्रभागांमध्ये एकच जागा बिनराखीव राहिलेली आहे असे प्रभाग सोडतीमधून वगळण्यात यावेत.

६.३.३ त्यानंतर ज्या प्रभागामध्ये मागील निवडणुकांमध्ये ना.मा.प्र. ची जागा नेमून देण्यात आली नव्हती त्या प्रभागामध्ये प्रथम ना.मा.प्र. ची एक जागा थेटपणे नेमून देण्यात यावी.

६.३.४ त्यानंतर मागील निवडणुकांमध्ये ज्या प्रभागांमध्ये ना.मा.प्र. ची जागा देण्यात आली होती, त्यामधून सोडत काढून ना.मा.प्र. च्या जागांचे वाटप करण्यात यावे.

६.३.५ सोडत काढल्यानंतरही जर ना.मा.प्र. च्या जागा शिल्लक असतील तर त्या जागांचे वाटप ६.३.२ नुसार वगळलेल्या (एक जागा बिनराखीव असलेल्या) प्रभागातून सोडतीने करण्यात यावे.

**७. महिलांचे आरक्षित प्रभाग निश्चित करणे** :

एकूण जागांच्या ५०% जागा महिलांकरीता आरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

**७.१ महिला आरक्षणाची तत्वे:**

७.१.१ महिलांच्या आरक्षणाचे वाटप सोडतीने करण्यात येईल.

७.१.२ जर एखाद्या प्रभागात एकाच प्रवर्गाकरिता दोन जागा आरक्षित होत असल्यास, त्यातील एक जागा त्या प्रवर्गातील महिलांकरिता **थेटपणे आरक्षित** होईल.

७.१.३ महिलांच्या जागांचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवताना, प्रभागात त्याच प्रवर्गातील महिलांचे आरक्षण शक्यतोवर पुन्हा देता येणार नाही.

**७.२ अ.जा.महिला:**

**अ) नवनिर्मित ग्रामपंचायतींची प्रथम निवडणूक-**

७.२.१ **नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या प्रथम निवडणुकीमध्ये** अ.जा.करिता आरक्षित असलेल्या जागांमधून अ.जा.च्या महिलांकरिता जागा **सोडतीने** आरक्षित करण्यात याव्यात.

७.२.२ मात्र जर एखाद्या प्रभागामध्ये अ.जा.करिता दोन जागा आरक्षित असतील तर त्या प्रभागामध्ये एक जागा अ.जा.च्या महिलांकरिता प्रथम थेट आरक्षित करण्यात येईल आणि तो प्रभाग परिच्छेद ७.२.१ मध्ये नमूद केल्यानुसार उर्वरित जागेसाठी सोडत काढताना वगळण्यात येईल.

**ब) इतर ग्रामपंचायतीमध्ये होणारी निवडणूक-**

७.२.३ **इतर कोणत्याही निवडणुकांमध्ये** अ.जा.च्या महिलांचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवताना जर एखाद्या प्रभागामध्ये अ.जा.करिता दोन जागा आरक्षित असतील तर त्या प्रभागामध्ये एक जागा अ.जा.च्या महिलांकरिता प्रथम थेट आरक्षित करण्यात येईल आणि तो प्रभाग सोडत काढताना वगळण्यात येईल.

७.२.४ त्यानंतर उर्वरित जागांकरिता, मागील निवडणूकांमध्ये जे प्रभाग अ.जा. महिलांकरीता आरक्षित होते असे प्रभाग आणि परिच्छेद ७.२.३ नुसार अ.जा. महिला करिता थेट आरक्षित केलेले प्रभाग वगळून अ.जा.च्या महिलांची सोडत काढण्यात यावी.

७.२.५ मात्र त्यानंतरही जर अ.जा.च्या महिलांकरिता आरक्षित ठेवावयाच्या जागा शिल्लक असतील तर जे प्रभाग परिच्छेद ७.२.३ नुसार वगळण्यात आले होते, त्यांचाही विचार अ.जा.च्या महिलांचे आरक्षण देण्याकरिता सोडतीने करण्यात यावा.

**७.३ अ.ज.महिला:**

**अ) नवनिर्मित ग्रामपंचायतींची प्रथम निवडणूक-**

७.३.१ **नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या प्रथम निवडणुकीमध्ये** अ.ज.करिता आरक्षित असलेल्या जागांमधून अ.ज.च्या महिलांकरिता जागा सोडतीने आरक्षित करण्यात याव्यात.

७.३.२ मात्र जर एखाद्या प्रभागामध्ये अ.ज.करिता दोन जागा आरक्षित असतील तर त्या प्रभागामध्ये एक जागा अ.ज.च्या महिलांकरिता प्रथम थेट आरक्षित करण्यात येईल आणि तो प्रभाग परिच्छेद ७.३.१ मध्ये नमूद केल्यानुसार उर्वरित जागेसाठी सोडत काढताना वगळण्यात येईल.

**ब) इतर ग्रामपंचायतीमध्ये होणारी निवडणूक-**

७.३.३ **इतर कोणत्याही निवडणुकांमध्ये** अ.ज.च्या महिलांचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरवताना जर एखाद्या प्रभागामध्ये अ.ज.करिता दोन जागा आरक्षित असतील तर त्या प्रभागामध्ये एक जागा अ.ज.च्या महिलांकरिता प्रथम थेट आरक्षित करण्यात येईल आणि तो प्रभाग सोडत काढताना वगळण्यात येईल.

७.३.४ त्यानंतर उर्वरित जागांकरिता, मागील निवडणूकांमध्ये जे प्रभाग अ.ज. महिलांकरीता आरक्षित होते असे प्रभाग आणि परिच्छेद ७.३.३ नुसार अ.ज. महिला करिता थेट आरक्षित केलेले प्रभाग वगळून अ.ज.च्या महिलांची सोडत काढण्यात यावी.

७.३.५ मात्र त्यानंतरही जर अ.ज.च्या महिलांकरिता आरक्षित ठेवावयाच्या जागा शिल्लक असतील तर जे प्रभाग परिच्छेद ७.३.३ नुसार वगळण्यात आले होते, त्यांचाही विचार अ.ज.च्या महिलांचे आरक्षण देण्याकरिता सोडतीने करण्यात यावा.

**७.४ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला (ना.मा.प्र. महिला) :**

**अ) नवनिर्मित ग्रामपंचायतींची प्रथम निवडणूक-**

७.४.१ **नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या प्रथम निवडणुकीमध्ये** ना.मा.प्र. करिता आरक्षित असलेल्या जागांमधून ना.मा.प्र.च्या महिलांकरिता जागा सोडतीने निश्चित करण्यात याव्यात.

**ब) इतर ग्रामपंचायतीमध्ये होणारी निवडणूक-**

७.४.२ इतर कोणत्याही निवडणूकांमध्ये जे प्रभाग ना.मा.प्र. महिलांकरीता आरक्षित होते असे प्रभाग वगळून ना.मा.प्र.च्या महिलांची सोडत काढण्यात यावी.

**७.५ सर्वसाधारण महिला:**

७.५.१ प्रत्येक प्रभागात महिलांच्या जागा नेमून देताना शक्यतोवर **दोन सदस्यांच्या प्रभागात जास्तीत जास्त १** व **तीन सदस्यांच्या प्रभागात जास्तीत जास्त २ जागा** कोणत्याही प्रवर्गातील महिलांकरिता देण्यात याव्यात. हे प्रमाण पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्वसाधारण महिलांच्या जागा प्रभागांमध्ये थेट वाटप करता येतील. मात्र असे करताना असे प्रभाग शिल्लक असलेल्या जागेपेक्षा जास्त असल्यास सोडत काढताना मागील निवडणुकांमध्ये ज्या प्रभागांमध्ये सर्वसाधारण महिलांचे आरक्षण देण्यात आले होते असे प्रभाग सर्वसाधारण महिलांची सोडत काढताना वगळण्यात यावेत.

७.५.२ जर सोडतीनंतरही सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित ठेवावयाच्या जागा शिल्लक असतील तर वगळण्यात आलेल्या प्रभागांचा विचार महिलांच्या जागांचे वाटप करण्याकरिता सोडतीने करण्यात येईल.

## ८. आरक्षणाची सोडत काढणे:

८.१ तहसिलदार सोडत घेण्याकरीता **प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक** करतील आणि **सोडतीचा दिनांक व वेळ** ठरवून देतील.

८.२ सदर प्राधिकृत अधिकारी, तलाठी व ग्रामसेवक हे सोडतीकरीता विशेष ग्रामसभा बोलावतील. अशा विशेष ग्रामसभेस **गणपूर्तीची आवश्यकता नसेल**. तसेच सोडतीच्या कार्यवाहीला ग्रामपंचायतीच्या मान्यतेची आवश्यकता असणार नाही.

८.३ सोडतीचे स्थळ, वेळ व दिनांक याला **मोठया प्रमाणावर प्रसिध्दी** दिली जाईल. ग्रामपंचायत, तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिल व पंचायत समिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर याची सूचना प्रदर्शित करण्यात यावी. गावातील सर्वांना सोडतीच्या कार्यक्रमाची बातमी मिळेल अशा प्रकारची व्यवस्था करावी, जेणेकरून जास्तीत जास्त नागरीक सोडतीस उपस्थित राहू शकतील.

८.४ प्राधिकृत अधिकारी आरक्षणासाठी विहित कार्यपध्दतीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला या क्रमावारीने आरक्षण निश्चित करतील. असे आरक्षण निश्चित करताना परिच्छेद ३ नुसार काढलेले मागील निवडणुकांमधील आरक्षण विचारात घेतील आणि परिच्छेद ४, ५, ६ व ७ नुसार आरक्षण विचारात घेऊन सोडत काढतील.

८.५ सदर सोडतीच्या वेळी कोणतीही जागा "पुरुष राखीव" अशी संबोधली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

८.६ सोडत ही पारदर्शक डब्यातून प्राथमिक शाळेतील मुलांकडून चिठ्ठया काढून पूर्ण करण्यात यावी.

८.७ आरक्षण सोडतीनंतर तहसिलदार यांनी **परिशिष्ट ८ नुसार विवरणपत्र** तयार करावे व जिल्हाधिकारी यांना सादर करावे.

८.८ सोडतीचे योग्य प्रकारे इतिवृत्त लिहिण्यात यावे. इतिवृत्ताचा नमूना **परिशिष्ट ९** मध्ये देण्यात आलेला आहे.

**९. प्रारुप आरक्षणांची व्यापक प्रसिद्धी:**

९.१ निश्चित करण्यात आलेले जागांच्या आरक्षणाची **परिशिष्ट १० नमूना 'ब '** मधील प्रारूप **अधिसूचना व अनुसूची** तयार करून त्यास व्यापक प्रसिध्दी देण्याची जबाबदारी तहसिलदार यांची असेल.

९.२ **प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप अधिसूचनेवर तहसिलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.**

९.३ आरक्षणाची प्रारूप अधिसूचना ग्रामपंचायत, तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिल व पंचायत समिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर देखील प्रदर्शित करण्यात येईल.

९.४ आरक्षणाचा प्रारूप तक्ता व विविध नमूने, सोडतीचे इतिवृत्त इ. ईमेलद्वारे अगर उपलब्ध करून दिलेल्या पद्धतीने संबंधित जिल्हाधिकारी/राज्य निवडणूक आयोगास सादर करावेत.

**१०. हरकती व सूचना:**

१०.१ विशेष ग्रामसभेत आरक्षण सोडतीअंती ग्रामस्थांना आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीची माहिती देण्यात येईल.

१०.२ हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीत नागरीकांकडून हरकती व सूचना स्विकारण्याची व्यवस्था तहसिलदार कार्यालयात करण्यात येईल.

१०.३ हरकत किंवा सूचना दाखल केल्याची संबंधीतांना पोचपावती देण्यात येईल ज्यामध्ये त्यांनी हरकत सादर करतानाचा दिनांक व वेळ नमूद केला जाईल.

१०.४ आलेल्या हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे.

१०.५ तहसिलदार द्वारा प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांचा गोषवारा **परिशिष्ट ११** नूसार तयार करण्यात येईल आणि सदर गोषवारा आणि हरकती उपविभागीय अधिकारी यांना सादर करण्यात येतील.

१०.६ उपविभागीय अधिकारी प्राप्त हरकतींवर सुनावणीच्या वेळी प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या अर्जदारांना सुनावणी द्यावी. आवश्यकतेनुसार नायब तहसिलदार या दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याकडून स्थळ पाहणी अहवाल घेतील. अश्या सुनावणीचा उद्देश हा

हरकतदाराची बाजू समजून घेणे आणि त्यावर आयोगाच्या या आदेशानुसार पुढे कार्यवाही होणे हाच आहे.

१०.७ सुनावणीनंतर, उपविभागीय अधिकारी प्रत्येक हरकतीवर त्यांच्या शिफारशी व अभिप्राय नोंदवून प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेसाठी सादर करतील.

१०.८ **जिल्हाधिकारी हे, उपविभागीय अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव विचारात घेवून हरकतींबाबत अंतिम निर्णय घेतील.**

१०.९ हरकतींवरील घेतलेले निर्णय हे तर्कसंगत असणे आवश्यक आहे. संबंधीत तहसिलदार हे, **परिशिष्ट १२** मध्ये दिलेल्या नमुन्यांनुसार हरकती व त्यावरील निर्णयाबाबतचा अहवाल ग्रामपंचायत व तलाठी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रदर्शित करवून घेतील.

**११. आरक्षण अंतिम करणे :**

११.१ जिल्हाधिकारी यांनी हरकतींवर दिलेले निर्णय विचारात घेवून **परिशिष्ट १३** नमूना 'अ ' नुसार तहसिलदार यांनी अधिसूचना व अनुसूची तयार करावी.

११.२ सदर अधिसूचना उपविभागीय अधिकारी यांना सादर करावी. उपविभागीय अधिकारी हे, जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या हरकतींनुसार आरक्षणात योग्य बदल केले असल्याबाबत खात्री करून त्यानंतर ते जिल्हाधिकारी यांना सादर करतील.

११.३ अशा अंतिम अधिसूचनेस जिल्हाधिकारी यांनी मान्यता द्यावी. आरक्षणाचा तक्ता व विविध नमूने, सोडतीचे इतिवृत्त, हरकतींचा गोषवारा व जिल्हाधिकारी यांचे हरकतींवरील आदेश याचे संबंधित जिल्हाधिकारी यांनी संकलन करावे व आवश्यकतेनुसार राज्य निवडणूक आयोगास सादर करावेत.

११.४ संबंधीत तहसिलदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांची या अंतिम अधिसूचनेवर (नमूना 'अ ') स्वाक्षरी राहिल आणि सदर अधिसूचना ग्रामपंचायत व तलाठी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रदर्शित केली जाईल.

११.५ यानंतर अंतिम अधिसूचनेवर कोणतीही हरकत अगर सुनावणी नियमानुसार अभिप्रेत नाही.

१२. **सर्वसाधारण**

१२.१ भारताच्या संविधानाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाचे पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित केले आहेत. त्यामुळे विभागीय

आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना स्वतःहून निवडणूक कार्यक्रमात कोणताही बदल अगर स्थगिती अगर निवडणूक थांबविता येणार नाही.

१२.२ यापूढे होणाऱ्या बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणूकांमध्ये **"ग्रामपंचायत (बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रात असलेल्या) सार्वत्रिक निवडणूक (आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे) आदेश, २०२६"** या आदेशामध्ये केलेल्या तरतूदी लागू राहतील.

**( दिनेश वाघमारे )**
**राज्य निवडणूक आयुक्त,**
**महाराष्ट्र**

**सहपत्र** :-

सोबतच्या अनुक्रमणिकेत दर्शविल्यानुसार परिशिष्ट १ ते १३

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी,
५. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
६. सर्व उप जिल्हाधिकारी (ग्रामपंचायत निवडणूक) (जिल्हा मुख्यालय)/सर्व उपविभागीय अधिकारी
७. सर्व तहसीलदार /सर्व गट विकास अधिकारी /सर्व मंडळ अधिकारी /सर्व ग्राम सेवक /सर्व तलाठी
८. आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती.

# अनुक्रमणिका


| परिशिष्ट क्र. | तपशिल | पृ.क्र. |
|---|---|---|
| १ | लोकसंख्येनुसार सदस्य संख्या, प्रभाग संख्या व प्रभागनिहाय सदस्य संख्या | १८ |
| २ | पुढील निवडणुकांमध्ये प्रभागनिहाय सदस्य संख्या चक्रानुक्रमे फिरविणे | १९ |
| ३ | आरक्षणाच्या प्रवर्गनिहाय सदस्य संख्येची निश्चिती<br>(बिगर अनुसूचित /अंशत: अनुसूचित क्षेत्राकरिता) | २०-२१ |
| ४ | उच्च न्यायालयाच्या २००६ च्या निकालानंतरच्या निवडणुकांच्या आरक्षणाची माहिती | २२ |
| ५ | अनुसूचित जाती लोकसंख्येची प्रभाग निहाय टक्केवारी (उतरत्या क्रमाने) | २३ |
| ६ | अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची प्रभाग निहाय टक्केवारी (उतरत्या क्रमाने) | २४ |
| ७ | उदाहरणे (Illustrations) | २५-२६ |
| ८ | विवरणपत्र | २७-२८ |
| ९ | विशेष ग्रामसभेचे इतिवृत्त | २९-३० |
| १० | प्रारूप प्रभाग रचना अधिसूचना नमुना “ब” व अनुसूची | ३१-३३ |
